**L. A. BILL No. XXXVI OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६.**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९६४ चा महा. २०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३, यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे), याच्या कलम १३ मधील, पोट-कलम (१), खंड (अ) मधील, उप-खंड (एक) मध्ये " त्याखाली केलेले नियम यांच्या अर्थांतर्गत असलेल्या " या मजकुरानंतर " ज्या त्यांच्या सदस्यांना पीक कर्ज संवितरित करतात, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९६४ चा महा. २०

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १५अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५अ मधील, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मध्ये, " प्रशासक मंडळ हे, " या मजकुराऐवजी " सात सदस्यांपेक्षा अधिक नसणारे प्रशासक मंडळ हे, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३१ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ मधील, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अ) बाजार समिती, ती ठरवील त्या दराने, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट नसलेल्या कृषि उत्पन्नाचे किंवा अकृषि उत्पन्नाचे पणन करण्यासाठी, बाजार क्षेत्रात बाजार समितीद्वारे पुरविलेल्या कोणत्याही ठिकाणाच्या किंवा सुविधेच्या वापरासाठी, व्यापारी, अडत्या, दलाल, प्रक्रियाकार, वखारवाला किंवा इतर कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही बाजार कार्याधिका-याकडून, संचालकाच्या पूर्वमान्यतेने, वापरकर्ता आकार बसवण्यास आणि तो वसूल करण्यास सक्षम असेल. ".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३४अ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४अ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१) मधील, " त्याच्याकडून नेमण्यात येईल अशा कर्मचारीवर्गाच्या " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (२) मधील, " पाच पैसे " या मजकुराऐवजी " दहा पैसे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मधील, पोट-कलम (१) मध्ये, दुस-या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, बाजार समितीद्वारे, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर आणि रीतीने, संचालकांच्या पूर्व मान्यतेने सचिव व इतर अधिकारी आणि कर्मचा-यांना, नियुक्त करण्यात येईल.".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३५अ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५अ मध्ये " सहायक निबंधक, सहकारी संस्था " या मजकुराऐवजी " सहकार अधिकारी, श्रेणी-दोन " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४५ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४५ मधील, पोट-कलम (२) मधील खंड (क) मध्ये, " प्रशासक मंडळाची " या मजकुराऐवजी, " सात सदस्यांपेक्षा अधिक नसलेल्या प्रशासक मंडळाची " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५७ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५७ मध्ये,–

(एक) पोट-कलम (३) मध्ये, " पोट-कलम (२) च्या अर्थानुसार " या मजकुरानंतर, " राज्य पणन मंडळास किंवा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) समास टीपेमध्ये, " सरकारला किंवा " या मजकुराऐवजी, " सरकारला किंवा राज्य पणन मंडळाला किंवा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६० मधील, पोट-कलम (२) मधील खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६० ची सुधारणा.

" (ग-१) कलम ३५ च्या पोट-कलम (१) च्या दुस-या परंतुका अन्वये, बाजार समितीचा सचिव आणि असे इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती आणि रीत विहित करणे.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

बाजार क्षेत्रातील शेतीच्या व इतर विवक्षित उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीचा आणि त्याकरिता राज्यात स्थापन करावयाच्या बाजारांचा तसेच खाजगी बाजारांचा व शेतकरी-ग्राहक बाजारांचा विकास व विनियमन करण्यासाठी आणि अशा बाजारांच्या संबंधात घटित करावयाच्या किंवा अशा बाजारांशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी काम करणा-या बाजार समित्यांना अधिकार देण्यासाठी आणि बाजार समितीच्या प्रयोजनासाठी बाजार निधी स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०) अधिनियमित केला आहे.

२. प्रस्तावित असलेल्या सुधारणा पुढीलप्रमाणे विस्तृतपणे स्पष्ट केल्या आहेतः-

(क) उक्त अधिनियमाच्या कलम १३ मध्ये बाजार समित्या घटित करण्याची तरतूद आहे. कलम १३(१) (अ) (एक) मध्ये, कृषि पतसंस्थांच्या व बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन समित्यांच्या सदस्यांकडून अकरा सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद आहे. आता, राज्यातील बहुउद्देशीय सहकारी संस्थांची संख्या वाढलेली आहे. अशा प्रतिनिधित्वासाठी कोणत्या बहुउद्देशीय संस्था पात्र असतील, याबाबत स्पष्टता नसल्यामुळे, ज्या बहुउद्देशीय सहकारी संस्था त्यांच्या सदस्यांना पीक कर्ज संवितरित करतात, केवळ त्यांना पात्र करण्याच्या दृष्टीने, उक्त कलम १३(१) (अ) (एक) ची सुधारणा करणे इष्ट वाटते.

(ख) उक्त अधिनियमाच्या कलम १५अ मध्ये, सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर प्रशासक नेमण्याची तरतूद आहे. कलम १५अ (१)(ब) मध्ये, संचालक किंवा प्राधिकृत असा अधिकारी समितीचे कामकाज पाहण्यासाठी प्रशासकाची किंवा प्रशासक मंडळाची नेमणूक करील, अशी तरतूद आहे. प्रशासक मंडळाचा सदस्य म्हणून नेमणूक करावयाच्या व्यक्तींच्या संख्येवर कोणताही निर्बंध नसल्यामुळे, प्रशासक मंडळ म्हणून, मोठ्या संख्येने व्यक्तींची नेमणूक करणे ही एक प्रथा बनली आहे आणि परिणामतः समितीला अशा मोठ्या प्रशासक मंडळाच्या देखभालीसाठी मोठी रक्कम खर्च करावी लागते. म्हणून, सातपेक्षा अधिक सदस्य नसणा-या प्रशासक मंडळाच्या नियुक्तीची तरतूद करून, असा खर्च कमी करणे इष्ट वाटते.

राज्य शासनास, आदेशाद्वारे, एकतर प्रकरण तीनच्या तरतुदींनुसार नवीन बाजार समिती घटित करता येईल किंवा प्रशासकाची किंवा सातपेक्षा अधिक नसेल इतक्या सदस्यांच्या प्रशासक मंडळाची नेमणूक करता येईल, अशी तरतूद करण्याच्या दृष्टीने, वरील प्रमाणेच तरतूद कलम ४५(२)(क) मध्ये देखील प्रस्तावित केली आहे.

(ग) उक्त अधिनियमाचे कलम ३१ हे, बाजार समितीस, बाजार क्षेत्रात पणन केलेल्या कृषि उत्पन्नाच्या प्रत्येक खरेदीदारावर फी व अडतीचे दर बसवण्यास सक्षम करते. तथापि, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट न केलेल्या कृषि उत्पन्नाचे किंवा बिगर-कृषि उत्पन्नाचे, बाजार क्षेत्राच्या आत पणन करण्याकरिता बाजार समितीने दिलेल्या कोणत्याही ठिकाणाच्या किंवा सुविधेच्या वापराबद्दल व्यापारी, अडत्या, दलाल, प्रक्रियाकार, वखारवाला यांसारख्या कोणत्याही बाजार कार्याधिका-यांवर किंवा इतर कोणत्याही व्यक्तींवर वापरकर्ता आकार बसवण्याचे व त्यांच्याकडून ते वसूल करण्याची कोणतीही तरतूद नाही. म्हणून, उक्त कलम ३१ मध्ये नवीन पोट-कलम (१अ) समाविष्ट करणे इष्ट वाटते, जेणेकरून बाजार समिती, संचालकाच्या पूर्व मंजुरीने, ती निर्धारित करील अशा दराने अशा बाजार कार्याधिका-यावर वापरकर्ता आकार बसवील आणि त्यांच्याकडून वसूल करील.

(घ) उक्त अधिनियमाच्या कलम ३४अ मध्ये, बाजार क्षेत्रात कृषि उत्पन्न खरेदी करणारी व्यक्ती पर्यवेक्षण परिव्यय म्हणून पाच पैशांचा परिव्यय राज्य शासनाला देईल, अशी तरतूद आहे. आता, परिव्ययाची रक्कम दर प्रत्येक शंभर रुपयास पाच पैश्यांवरून दहा पैसे इतकी वाढवणे, इष्ट वाटते.

(ङ) उक्त अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये, बाजार क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी वर्ग नोकरीला ठेवण्यासाठी बाजार समिती सक्षम आहे, अशी तरतूद आहे. तथापि, बाजार समितीने सचिव, अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्याकरिता एकसमान नियम नाहीत. म्हणून, बाजार समितीचे सचिव आणि असे इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या एकसमान अटी व शर्ती आणि रीत विहित करणे आवश्यक वाटते.

(च) बाजार समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करण्यासाठी अधिका-यांचे आणखी पर्याय उपलब्ध करण्यासाठी, बाजार समितीचा सचिव म्हणून, सहकार अधिकारी, श्रेणी-दोन, याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सहकार विभागातील कोणत्याही अधिका-याची नियुक्ती करणे प्रस्तावित आहे. म्हणून, कलम ३५अ मध्ये यथोचित सुधारणा करणे प्रस्तावित आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २१ डिसेंबर, २०२१.

**बाळासाहेब पाटील,**
पणन मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

खंड ६.—या खंडान्वये, बाजार समितीद्वारे नियुक्त करावयाचे सचिव, इतर अधिकारी व कर्मचा-यांच्या नेमणुकीच्या आणि सेवेच्या अटी व शर्ती आणि रीत नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा उपरोल्लिखित प्रस्ताव हा, सामान्य स्वरूपाचा आहे.

(शा.म.मु.) एचबी १७२१–३ (८४०–१२-२०२१)

## सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक ३६–महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधयेक, २०२१ याचे परिशिष्ट

## [महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ याल उतारे]

## (सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०)

**१.** ते **१२.** ** ** **

**१३.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने प्रत्येक बाजार समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :— बाजार समित्यांची रचना.

(अ) बाजार क्षेत्रात राहणारे (ज्यांची संबंधित मतदार संघाच्या मतदार यादीत नावे असतील असे आणि जे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने, आवश्यकता भासल्यास, जिल्हाधिका-याच्या किंवा, यथास्थिति, जिल्हा उप निबंधकाच्या मदतीने याबाबतीत, वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षांहून कमी वयाचे नसतील असे) खाली विनिर्दिष्ट केलेल्याप्रमाणे पंधरा शेतकरी,—

"(एक) बाजार क्षेत्रात कार्य करणा-या कृषि पत संस्था व बहुउद्देशिय सहकारी संस्था (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली केलेले नियम यांच्या अर्थांतर्गत असलेल्या) त्यांच्या व्यवस्थान समितीच्या सदस्यांकडून अकरा सदस्य [त्यापैकी दोन महिला असतील एक इतर मागासवर्गातील व्यक्ती असेल आणि एक निरधिसूचित जमातींतील (विमुक्त जातीतील) किंवा भटक्या जमातीतील व्यक्ती असेल] निवडून देण्यात येतील :

परंतु, जर बाजार समिती आदिवासी क्षेत्रात स्थित असेल तर, निरधिसूचित जमातीतील (विमुक्त जातीतील) किंवा भटक्या जमातीतील व्यक्तीच्या निवडणुकीच्या जागी, अनुसूचित जमातीतील एका व्यक्तीस उपरोक्तप्रमाणे निवडून देण्यात येईल ; आणि

(दोन) बाजार क्षेत्रात कार्य करणा-या ग्रमपंचायतींच्या सदस्यांकडून चार सदस्य (त्यांपैकी एक अनुसूचित जातीतील किंवा अनुसूचित जमातीतील व्यक्ती असेल आणि एक आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्ती असेल) निवडून देण्यात येतील ; " ;

**(ब)** ते **(ग)** ** ** **

**(१अ)** ते **(१क)** ** ** **

**१४.** व **१५.** ** ** **

**१५-अ**(१) या अधिनियमाच्या कलम १५, पोट-कलम (३) मध्ये किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये, काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही बाजार समितीच्या सदस्यांच्या दोन वर्षाचा किंवा पाच वर्षांचा पदावधी कलम १४, पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये कोणताही वाढीव पदावधी असल्यास तो संपलेला असेल त्याबाबतीत, संचालक किंवा त्याने प्राधिकृत केलेला, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही अधिकारी, लेखी आदेशाद्वारे, असा निदेश देईल की,— सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर प्रशासक नेमण्याची तरतूद.

(अ) ** ** **

(ब) संचालकाने किंवा अशा प्राधिकृत अधिका-याने नेमलेला प्रशासक व प्रशासक मंडळ हे, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून आणि निवडणूक घेतल्यानंतर, पुनर्घटित समितीची गणपूर्ती असलेली पहिली सभा होईल त्या दिवसापर्यंतच्या कालावधीत (यात यापुढे या कलमामध्ये ज्याचा निदेश " उक्त कालावधी " असा करण्यात आला आहे) समितीचे कामकाज पाहील, अशी निवडणूक ही प्रशासकाने वा प्रशासक मंडळाने अधिकारपद ग्रहण केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत घेण्यात येईल :

परंतु, अपवादात्मक परिस्थितीत, राज्य शासनाला **राजपत्रा**तील अधिसूचनेद्वारे तीत नमूद करण्यात येतील अशा कारणांस्तव हा सहा महिन्यांचा कालावधी, वेळोवेळी, सर्व मिळून जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल.

**(१अ)** ** ** **

**(२)** ते **(४)** ** ** **

**१६.** ते **३४.** ** ** **

कोणत्याही बाजारातील किंवा बाजार क्षेत्रातील कृषि उत्पन्नाच्या खरेदीवरील पर्यवेक्षण व पर्यवेक्षणाचा परिव्यय खरेदीदारांनी देणे.

**३४-अ** (१) राज्य शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, असा निदेश देता येईल की, कोणत्याही बाजारातील किंवा बाजारक्षेत्रातील ज्या कृषिउत्पन्नाच्या पणनाचे विनियमन या अधिनियमान्वये होत असेल अशा कृषि उत्पन्नाची खरेदी राज्य शासनास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, ते नेमील अशा कर्मचारीवर्गाच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात यावे ; आणि या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीनतेने, अशा पर्यवेक्षणाचा परिव्यय, अशा बाजारात किंवा बाजार क्षेत्रात असे उत्पन्न खरेदी करणा-या व्यक्तीने राज्य शासनास द्यावे.

(२) खरेदीदाराने द्यावयाचा परिव्यय, वेळोवेळी, राज्य शासन निर्धारित करील आणि बाजारात किंवा बाजार क्षेत्रात (राज्य शासनास योग्य वाटेल अशा रीतीने) अधिसूचित करील हा परिव्यय अशा रीतीने ठरविण्यात येईल की, परिव्ययाची रक्कम, खरेदीदाराने खरेदी केलेल्या कृषि उत्पन्नाच्या खरेदी किंमतीच्या दर शंभर रुपयांस पाच पैसे यापेक्षा अधिक असता कामा नये.

**३४ब.** व **३४क.** ** ** **

कर्मचारी वर्ग नोकरीला ठेवण्याचा बाजार समितीचा अधिकार.

**३५.** (१) बाजार समितीला, बाजाराच्या व्यवस्थापनासाठी, पिकांविषयीची आकडेवारी व बाजार-वृत्त या संबंधीची माहिती गोळा करण्यासाठी, ती यथावत ठेवण्यासाठी, तिचा प्रसार करण्यासाठी व ती पुरवण्यासाठी आणि या अधिनियमान्वये आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, सचिव व आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी नोकरीस ठेवता येतील, आणि अशा अधिका-यांना व कर्मचा-यांना असे वेतन आणि भत्ते, निवृत्तिवेतन किंवा उपदान देता येईल. आणि अशा सर्व कर्मचा-यांच्या लाभासाठी स्थापन करण्यात येईल त्या भविष्यनिर्वाह निधीमध्ये किंवा निवृत्तिवेतन निधीमध्ये अंशदान देता येईल :

परंतु, सचिवाच्या अधिकारपदाहून अन्य सर्व अधिकारपदे, याबाबत संचालक काढतील, अशा सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीनतेने केवळ संचालकांच्या पूर्वमान्यतेने निर्माण करता येतील :

परंतु आणखी असे की, राज्य पणन मंडळ, अर्हता आणि अनुभव यानुसार, बाजार समित्यांवर सचिव म्हणून नियुक्त करण्यात यावयाच्या व्यक्तीची यादी तयार करील आणि नाव नोंदणी केलेल्या व्यक्तींच्या यादीतून एका व्यक्तीची सचिव म्हणून नियुक्ती करणे हे बाजार समित्यांवर बंधनकारक असेल.

**(२)** व **(३)** ** ** **

**३५अ.** ** ** **

**३६.** ते **४४.** ** ** **

बाजार समिती इत्यादींचे अधिक्रमण.

**४५. (१)** ** ** **

(२) पोट-कलम (१) अन्वये बाजार समितीचे अधिक्रमण करण्याविषयी आदेश काढण्यात आल्यानंतर पुढील परिणाम घडून येतील—

**(अ)** व **(ब)** ** ** **

"(क) राज्य शासनास, बाजार समितीची कार्ये पार पाडण्याकरिता, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, आदेशाद्वारे, एकतर प्रकरण तीनच्या तरतुदींअनुसार नवीन बाजार समिती घटित करता येईल किंवा प्रशासकाची वा प्रशासक मंडळाची नियुक्ती करता येईल; " ;

परंतु बाजार समितीची कार्ये पार पाडण्यासाठी खंड (क) अन्वये नियुक्त केलेला प्रशासक वा प्रशासक मंडळ, कार्यभार ग्रहण केल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, बाजार समितीच्या निवडणुका त्या कालावधीत घेतल्या जातील याची सुनिश्चिती करील. उक्त कालावधीत निवडणुका घेण्यात प्रशासकाने वा प्रशासक मंडळाने कसूर केल्यास, संचालकास, निवडणुका न घेण्याबद्दलच्या उचित समर्थनाविषयी त्याची खात्री पटल्यास, अशा निवडणुका घेणे त्या प्रशासकास वा प्रशासक मंडळास शक्य व्हावे यासाठी, सहा महिन्यांहून अधिक नसेल इतकी मुदत वाढवून देता येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| **(२अ)** | ** | ** | ** |
| **(३)** ते **(५)** | ** | ** | ** |
| **४६.** ते **५६.** | ** | ** | ** |
| **५७. (१)** व **(२)** | ** | ** | ** |

शासनाला किंवा बाजार समितीला येणे असलेल्या रकमांची वसुली.

(३) पोट-कलम (२) च्या अर्थानुसार बाजार समितीस किंवा कोणत्याही शेतक-यास एखादी रक्कम येणे आहे किंवा काय यासंबंधी कोणताही प्रश्न उद्‌भवला तर तो प्रश्न त्या प्रयोजनासाठी केलेल्या न्यायाधिकरणाकडे निर्देशित करण्यात येईल आणि असे न्यायाधिकरण, त्या योग्य अशी चौकशी केल्यानंतर आणि ज्या व्यक्तीकडून अशी अभिकथित रक्कम येणे असेल त्याला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या प्रश्नाचा निर्णय करील; आणि न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयामध्ये किंवा इतर प्राधिकरणापुढे हरकत घेता येणार नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| **(४)** ते **(५)** | ** | ** | ** |
| **५८.** व **५९.** | ** | ** | ** |
| **५९अ** व **५९ब** | ** | ** | ** |
| **६०.** ते **६६.** | ** | ** | ** |
| **अनुसूची.** | ** | ** | ** |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६. ]**

**[ महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. बाळासाहेब पाटील,**
पणन मंत्री. **]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई